# संत साहित्याची विश्वात्मकता

**अतुल तुकाराम झंजाड**
संशोधक विद्यार्थी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

**प्रास्ताविक-**

संतांनी निर्माण केलेली अध्यात्मिक लोकशाही आणि लोकप्रबोधन हे महाराष्ट्राचे सांस्कृतिक संचित आहे. संतांनी अभंग, ओव्या, भारुडे, कीर्तनांच्या माध्यमातून मराठी माणसाचे मन समृद्ध केले आहे. समाजातील दोषांवर बोट ठेऊन कधी कडाडून प्रहार केला तर कधी आपल्या आचरणातून लोकांना विश्वबंधुतेचा संदेश दिला. संतांच्या विचारांनी तत्कालीन समाजात जनजागृती तर केलीच परंतु अनेक शतके टिकतील असा विश्वबंधुत्वाची शिकवण लोकांना दिली आहे. ही विश्वबंधुत्वाची शिकवण संतांनी लिहिलेल्या अभंग, ग्रंथ यांमध्ये सातत्याने डोकावते. "महापुरुषांचे विचार जसे कालसापेक्ष असतात तसेच ते कालातीतही असतात. म्हणूनच आजच्या एकविसाव्या शतकातही ते कालबाह्य वाटत नाहीत; त्यांना आजही संदर्भमूल्य आहे. खर तर आज जागतिकीकरणाचा प्रचंड दुर्दम्य ओघ आपल्यावर झेपावत असताना तर त्यांच्या विचारांचे मोल, महत्व, आवश्यकता नि निकड अधिकच जाणवते."१ आजच्या काळात जातीयवाद, धर्मवाद, भाषावाद, प्रांतवाद, दशहतवाद तसेच हिंसाचार, अत्याचार मोठ्या प्रमाणात बोकाळला असून त्यावर संतांनी सांगितलेला विश्वकल्याणाचा मार्ग सोयीस्कर आणि उपयुक्त आहे. जगातील धर्मपंथ, संप्रदाय हे शुद्ध भावनेने निर्माण झालेले लोकसंग्रहाचे उदाहरणे आहेत. त्यांच्या साहित्यातून देखील विश्वबंधुत्वाची शिकवण दिली आहे.

'वसुधैव कुटूंबकम्' म्हणजे संपूर्ण जग माझे घर आहे, हे मानणारी आपली भारतीय संस्कृती आहे. संत ज्ञानेश्वर महाराजांनी वारकरी संप्रदायाचा पाया घालून 'हे विश्वचि माझे घर' असा वारकरी संप्रदायाला संदेश दिला. हेच विश्वबंधुत्वाचे तत्वज्ञान संतांनी समाजामध्ये रुजवून परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. आपण या शोधनिबंधात संत साहित्यातून प्रकटणारा हा दृष्टीकोन बघणार आहोत.
संत साहित्याची विश्वात्मकता खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करूया.

१) विश्वात्मकता संकल्पना
२) संत साहित्यातील विश्वात्मक दृष्टीकोन
   अ) वैज्ञानिक दृष्टीकोन
   ब) जाती-धर्मनिरपेक्ष दृष्टीकोन
   क) नितीमूल्यांच्या आधारे प्रकट होणारा विश्वात्मक दृष्टीकोन
३) निष्कर्ष/समारोप

१) विश्वात्मकता संकल्पना-

'विश्व' म्हणजे पृथ्वीवरील सर्वच सजीव आणि निर्जिव सृष्टी होय. विश्वात्मक या शब्दाची संधी केली तर विश्व+आत्मक अशी होते, याचा अर्थ सारी सृष्टी व्यापून टाकलेला. हिंदीमध्ये विश्वात्मकता संकल्पनेसाठी सर्वत्रसत्व तर इंग्रजीत 'Universality' हा शब्द वापरला जातो. नी.बा.रानडे

यांनी संपादित केलेल्या इंग्रजी-मराठी शब्दकोशात त्याचा अर्थ सर्वव्यापिकता, विश्वव्यापिता, व्यापकत्व, सार्वत्रिकत्व,सार्वत्रिकता असा देण्यात आला आहे. विश्वात्मकता या शब्दाला विश्वबंधुत्व, विश्वकुटूंबी असेही शब्दप्रयोग रूढ आहे. मराठी शब्दवैभव या श्रीकांत जोशी संपादित शब्दकोशात विश्वबंधुत्वाचा अर्थ, "जगातील प्रत्येक व्यक्तीबाबतची आपुलकी भातृभाव" असा दिला आहे. मो. वि. भटावडेकर यांच्या 'मराठी पर्यायी शब्दांचा कोश' यामध्ये विश्वकुटूंबी या शब्दाचा अर्थ, "वसुधैव कुटूंम्बकम् वृत्तीचा, विशाल दृष्टीकोन असलेला, विश्वबंधुत्व मानणारा, विश्ववादी, सर्व धर्मजाती समावेशक" दिला आहे.

जाती, धर्म, पंथ,भाषेच्या मर्यादा ओलांडून मानवी कल्याणाचा मार्ग सांगणारे साहित्य विश्वात्मक साहित्य म्हणून ओळखले जाते. माणसामाणसातील द्वेष, राग, तिरस्कार संपून निकोप आणि सौहादर्यपूर्ण जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारी जीवनमूल्यांची पेरणी संतांनी आपल्या साहित्यातून केली आहे. प्रेम, भूतदया, शांती, क्षमा, अहिंसा ही नैतिक मूल्ये आणि एकता, एकात्मता, न्याय, स्वातंत्र्य यासारखी सांविधानिक मूल्यांचा पुरस्कार देखील संतांनी केला आहे. एकंदरीत विश्वात्मकता म्हणजे जात, धर्म, भाषा, प्रदेश, लिंग या भेदांपलीकडे जाऊन व्यापक मानवतेचा अंगीकार करणे होय.

२) संत साहित्यातील विश्वात्मक दृष्टीकोन-

संतांनी पंढरीच्या पांडूरंग विठ्ठलाला केंद्रस्थानी ठेवून भक्तीमार्गाचा अंगीकार केला असून त्यांच्या साहित्यातून विश्वात्मकता दिसून येते. समग्र वैश्विकतेचे सामाजिक भान ठेवणारी ही संतपरंपरा सर्वच भेदांच्या सीमारेषा ओलांडून विश्वकल्याणाचा मार्ग दाखवते. उपनिषदे भारतीय तत्वज्ञानाचा मूलस्रोत आहे. बृहदारण्यक उपनिषदातील एक ऋचा आहे की, "सर्वे भवन्तु सुखिन:| सर्वे सन्तु निरामय:|| सर्वे भद्राणि पश्यन्तु :| मा कश्चित दु:ख भाग्यवेत:|| म्हणजेच जगातील सर्व लोक सुखी, आरोग्यी आणि आनंदी राहो तसेच कुणालाही दु:ख येऊ नये, असा अर्थ होतो. प्राचीन वेद, उपनिषदे आणि पुराणे यामध्ये देखील समस्त मानवजातीच्या कल्याणाचा मार्ग सांगितला आहे.

अ) संत साहित्यातून व्यक्त झालेली वैज्ञानिकता-

वैज्ञानिक सत्य हे सार्वत्रिक सत्य असते. विज्ञानाच्या कसोट्यांवर घासूनपुसून प्रयोगांच्या आधारे चाचपणी केली जाते; त्यातून येणारे निष्कर्ष विश्वात्मक पातळीवर सत्य मानले जातात. संत साहित्यातून मोठ्या प्रमाणात वैज्ञानिक दृष्टिकोन प्रकट झाला आहे. संत ज्ञानेश्वरीच्या अध्याय अठराव्यात सांगतात की, 'तरी सत्वशुद्धीचिये वेळे| शास्त्रे का ध्यानबळे| ईश्वरतत्वीच मिळे| निष्टंक बुद्धी|| ते विज्ञान बरवे| गुणरत्न तेथे आठवे || म्हणजेच शास्त्र व ध्यान यातून शुद्ध आणि निश्चयात्मक बुद्धिला झालेले ईश्वरी ज्ञान म्हणजे विज्ञान होय. संतांच्या साहित्यातून व्यक्त झालेले ज्ञान आणि विज्ञान हे सगुण निर्गुण भक्तीच्या आधारे प्रकटले आहे. संत एकनाथ महाराज 'भागवतात' सांगतात की, 'हे ज्यासी ठसविले पूर्ण| विज्ञान जाण त्या नांव || विज्ञानाचे लक्षण| साधक होय पूर्णब्रह्म|| याचा अर्थ साधक पूर्ण ब्रह्म होणे हे विज्ञानाचे अंतिम उद्दीष्ट आहे. हे विज्ञानाचे नियम आणि कार्यकारणभाव संत साहित्याच्या संदर्भात मांडले तर संत साहित्यातून विश्वात्मकता प्रकट होते.

प्राचार्य अद्वयानंद गळतगे आपल्या 'संत साहित्यातील अंधश्रद्धा निर्मूलन' या लेखात लिहितात की, "बुद्धीवादी आत्मा व ईश्वर अदृश्य असल्यामुळे खोटा म्हणतात. संतांना तो माणसाच्या प्राणीमात्रांच्या रूपात प्रत्यक्ष दिसतो. त्यांची सेवा हीच ते ईश्वरसेवा मानतात. हाच संताचा भूती भगवत्द्भाव व वैज्ञानिक विश्वात्मकतावाद होय."२

तत्कालीन समाजात अज्ञान,अंधश्रद्धा, रूढी, परंपरा मोठ्या प्रमाणात बोकाळल्या होत्या. यांच्यावर संतांनी बोट ठेऊन वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारल्याचे आपल्याला लक्षात येईल. एका अर्थाने संतांनी समाजशुद्धीचे कार्य हाती घेतले होते. 'बुडता हे जन न देखवे डोळा, म्हणवून कळवळा येत असे' या संत उक्तीप्रमाणे संतांनी कार्मकांड, समाजविघातक विषमता, अस्पृश्यता, विटाळ, देवदेवस्की यासारख्या गोष्टींवर कडाडून प्रहार केला. संत तुकाराम महाराज एका अभंगात म्हणतात,

अंगी आणोनिया वारे| तया मागताती पोरे ||१||
नवसे कन्या पुत्र होती| तरी का करणे लागे पती ||२||

संत तुकाराम महाराजांच्या अंधश्रद्धेला खतपाणी न घालता वैज्ञानिकतेचा अंगीकार केला होता. त्यांचे अनेक अभंग भोंदूगिरी आणि कर्मकांडाला विरोध करणारे आहेत. संत एकनाथ महाराजांनी समाजातील वृत्ती- प्रवृत्तींवर भारुडाच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य केले आहे. संत एकनाथांनी सामान्य लोकांचे अज्ञान अभंगातून मांडले.

कष्ट नेणती भोगती| पावे दगडाते म्हणती|
सेंदूर माखूनिया धोंडा| पाया पडती पोरे रांडा||

अशा प्रकारे संतांच्या साहित्यातून वैज्ञानिक दृष्टिकोन प्रकटताना दिसतो.

ब) जाती-धर्मनिरपेक्ष दृष्टीकोन -

संत साहित्याने मानवजातीच्या उत्थानासाठी अविरत प्रयत्न केले. सर्वच भेदांच्या भिंतींना बाजूला सारून संतांनी जाती-धर्मनिरपेक्ष दृष्टीकोन अंगीकारल्याचे आपल्या निदर्शनास येईल. 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म| भेदाभेद अमंगळ||' असे सांगून पंढरीच्या वाळंवटात सर्वच जातीधर्माचे वारकरी मोठ्या आनंदाने विठ्ठलनामाचा गजर करत असतात. वारकरी संप्रदाय जरी हिंदू धर्मातील तत्वज्ञानावर उभा राहिलेला पंथ असला तरी विविध जाती-धर्माची लोक वारकरी संप्रदायात आहेत हे संप्रदायाचे वैशिष्ट्ये आहे, किंबहूना हा वारकरी संप्रदायाचा विश्वात्मक दृष्टीकोन आहे. डॉ. यु.म.पठाण सांगतात की, "भक्तीचा आणि मुक्तीचा अधिकार कुणालाही नाकारता येणार नाही, ही भूमिका चातुर्वर्ण्यातील विषमता अमान्य करणारी होती. म्हणजेच मानवतावादी होती नि उदारमतवादाचा पुरस्कार करणारी होती. अध्यात्मिक संदर्भातील विषमता अमान्य केली की, ओघानं सामाजिक संदर्भातील समताही प्रस्थापित व्हावी, अशी वारकरी संतांची भूमिका व धारणा होती."३ सामाजिक समता प्रस्थापित करत असताना संतांनी उदारमतवादी दृष्टीकोन ठेऊन सर्व जाती-धर्मांना सामावून घेतले. तत्कालीन समाजात जाती-पातीचे बंधने खूप मोठ्या प्रमाणात होती. अशा काळात वारकरी संप्रदायात अठरापगड जातींचे लोक सहभागी होते. संत नामदेव-शिंपी, संत सावता महाराज माळी, संत सेना नाभिक, संत चोखोबा सोयराबाई- महार, संत गोरोबा-कुंभार, संत नरहरी- सोनार इ. विविध जातींचे लोक तर संतकवी शेख

महंमद, अनगडशहा फकीर असे मुस्लिम धर्मातील संतही वारकरी संप्रदायात सहभागी होते. संत ज्ञानेश्वर महाराजांनी विश्व हेच माझे घर सांगून सर्व प्रकारचे अडसर दूर केले होते तर संत नामदेवांनी जाती जातीत प्रेमभावना निर्माण करून आपलेसे केले. डॉ. शिवाजीराव मोहिते आपल्या पुस्तकात संत नामदेवांबद्दल म्हणतात, " जिथे जिथे जीवनसंघर्ष पेटलेले होते, दीनदलित असंघटित झाले होते; त्यांना संघटित करण्याचा पहिला प्रयत्न संत नामदेवांचा आहे."४ संत सावतामाळी यांना विषमतेचे चटके सहन करावे लागले, त्या जाणिवेतून ते विठ्ठलाला उद्देशून आपल्या अभंगात म्हणतात,

माझी केली हीन जाती| तुम्ही उदार श्रीपती|
नका देवू भक्ती मुक्ती| माझी परिसावी विनंती|
सावता म्हणे पांडूरंगा | हु जेपणा न्यावे भंगा|

जातीव्यवस्थेचा कटू अनुभव जसा संत सावतामाळी यांना आला तसाच अनुभव संत चोखोबा यांना देखील आला होता. संत चोखोबा विठ्ठलभक्त असूनही त्यांना जातीमुळे विठ्ठलाचे दर्शन घेऊ दिले जात नव्हते. ती वेदना अभंगात मांडताना ते म्हणतात,

हीन याती माझी देवा| कैसी घडे तुझी सेवा|
मज दूर दूर हो म्हणती| तुज भेटू कवण्यारिती|

शेवटी संत जनाबाई सांगतात, 'जो भक्त यातिहीन | देव करी त्याचा मान||' याप्रमाणे विठ्ठलाने संत चोखोबांना दर्शन दिले. आजही पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरात संत चोखोबांची पायरी आहे. संत एकनाथ महाराजांनी तर व रखरखत्या उन्हात वाळवंटात रडत बसलेल्या शुद्राच्या मुलाला उचलून घरी नेऊन दिले होते. तसेच अस्पृश्य मानल्या गेलेल्या लोकांच्या पंगती बसविल्या होत्या. संत एकनाथांनी एका अभंगात म्हटले आहे की,

'ब्रह्मस्थितीचे हे वर्म | तुज दावितो सुगम|
सर्वाभूती भगवत्भाव | अभेदत्वे आपणचि||

जातीच्या भेदभावाचे अनुभव अनेक संतांना आले होते. संत तुकाराम महाराजांना तर शुद्र असल्यामुळे वेदांचा अभ्यास करण्याचा हक्क नाकारण्यात आला होता. याची शिक्षा म्हणून त्यांना आपल्या अभंगाच्या वह्या इंद्रायणीत बुडाव्या लागल्या होत्या. कोणत्याही प्रकारच्या भेदाला संत तुकाराम महाराजांनी थारा दिला नव्हता. 'विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म| भेदाभेद अमंगळ|' असे म्हणून त्यांनी सर्वच भेदांचा अडसर दूर केला होता. त्यांचा लेखनिक संतु जगनाडे हे तेली होते. तर संतकवी शेख महमंद आणि अनगडशहा फकीर हे त्यांच्या गोतावळ्यातील संत होते. संत तुकाराम महाराज आपल्या पंढरपूरच्या वाळंवटातील मेळ्याचे वर्णन करताना म्हणतात,

वर्णअभिमान विसरली याती,
एकएकां लोटांगणी जाती|

अशा प्रकारे संतांनी जातीधर्माच्या भिंती बाजूला सारून विश्वबंधुत्व म्हणजेच विश्वात्मकतेचा अंगीकार केला, तो आजतागायत टिकून आहे. "ज्ञानदेव-नामदेव यांच्या भागवत संप्रदायाने भगवदभक्तीचा मार्ग सर्व सामान्य जनतेस सुलभ व सोपा करून दिला. कोणत्याही जातीच्या माणसाने

येथे यावे व नामसंकीर्तनात न्हाऊन तृप्त व्हावे, पुण्यवंत होऊन जावे मग जातीचा प्रश्न फारसा उरु नये, अशीच रीत यानंतरच्या काळात रुढ झाली."५

क) नितीमूल्यांच्या आधारे प्रकट होणारा विश्वात्मक दृष्टीकोन -

संत साहित्यातून प्रामुख्याने सत्य, अहिंसा, सत्याग्रह, दया, क्षमा, शांती, वृत्ती- प्रवृत्ती, स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय या विश्वात्मक गोष्टींची जाणीव सातत्याने होत असते. संत ज्ञानेश्वर महाराजांनी अखंड विश्वाच्या कल्याणासाठी पसायदान मागितले. ते पसायदान सर्वव्यापक आणि सर्वस्पर्शी विचारांचा गाभा आहे. "पसायदान म्हणजे ज्ञानेश्वरीचा गाभा आहे. यात समाज, कल्याण, ज्ञान, भक्ती, तत्वज्ञान व कर्मही आहे. ही प्रार्थना म्हणजे मंत्राक्षर आहे कारण मनाने तारणारी आहे. चिंतनाने विकास साधणारी आहे. ही ज्ञानदेवांच्या क्रान्तदर्शी दिव्य प्रतिमेतून निर्माण होणारी विश्वव्यापक प्रार्थना आहे."६ पसायदानात विश्वकल्याणसाठी जगाच्या नियंत्याजवळ सर्व प्राणिमात्रांसाठी मागणे मागितले आहे. वाईट प्रवृत्तींचा नाश होऊन होवो, परस्परमैत्र वाढो, पापाचा अंधकार नाहीसा होवो अशा प्रकारच्या मागण्या संत ज्ञानेश्वर पसायदानात करतात. संत नामदेव महाराज हे संत ज्ञानेश्वरांच्या समकालीन होते. एकात्मतेची भावना ठेऊन ज्ञानाचा दिवा लावून जगातील अंधकार नष्ट करण्याचा त्यांचा मानस 'नाचू किर्तनाचे रंगी| ज्ञानदीप लावू जगी|' या अभंगातून व्यक्त होतो. संत चोखोबांना जातीयतेचे चटके सहन करावे लागले त्यावेळी त्यांच्या अभंगातून जे तत्वज्ञान व्यक्त झाले ते विश्वात्मक पातळीवर घेऊन जाणारे आहे. ते म्हणतात,

ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा ||
काय भुललासी वरलिया रंगा||

या अभंगातून जीवनविषयक तत्त्वज्ञान व्यक्त होते. संत ज्ञानेश्वर महाराजांची धाकटी मुक्ताबाई यांनी ताटीचे अभंग रचून ज्ञानेश्वरांना कृतीप्रवण तर केलेच पण संतत्वाची व्याख्याही सांगितली. भूतदया, क्षमा, शांती हे संतांची प्रमुख लक्षणे आहेत. संत एकनाथांनी काशीहून आणलेले पाणी तान्हलेल्या गाढवाला पाजल्याची आख्यायिका सांगितली जाते. संत तुकाराम महाराज आपल्या अभंगात मानवी सदाचार तसेच व्यावहारिक नितीमत्त्वेविषयी मांडणी करतात. ते म्हणतात,

जोडोनिया धन उत्तम व्यवहारे| उदास विचार तेच करी ||
उत्तमचि गती तो एक पावेल | भोगील जीव खाणी ||
परउपकारी नेणे परनिंदा | परस्त्रिया सदा बहिणी माया||
भूतदया गाई पशुंचे पालन | तान्हेल्या जीवन वनमाजी ||
शांतीरुपे नव्हे कोणाचा वाईट | वाढावी महत्व वडिलांचे ||
तुका म्हणे हेचि आश्रमाचे फळ | परम पद वैराग्याचे ||

(सार्थ तुकाराम गाथा -२०८५)

यांसारख्या अनेक अभंगातून संत तुकाराम महाराजांचे मानवी नैतिकमूल्ये आणि जीवनविषयक तत्त्वज्ञान व्यक्त होते. संत एकनाथांनी भारुडे आणि गवळणीच्या माध्यमातून समाजातील वृत्ती-प्रवृत्तींवर प्रहार केले होते. एकंदरीत संतसाहित्यातून जीवन आणि नैतिक मूल्ये व्यक्त होतात.

३) निष्कर्ष/समारोप -

१) संतांनी समाजातील दोषांवर बोट ठेऊन कधी कडाडून प्रहार केला तर कधी आपल्या आचरणातून लोकांना विश्वबंधुतेचा संदेश दिला.

२) आजच्या काळात जातीयवाद, धर्मवाद, भाषावाद, प्रांतवाद, दशहतवाद तसेच हिंसाचार, अत्याचार मोठ्या प्रमाणात बोकाळला असून त्यावर संतांनी सांगितलेला विश्वकल्याणाचा मार्ग सोयीस्कर आणि उपयुक्त आहे.

३) जाती, धर्म, पंथ,भाषेच्या मर्यादा ओलांडून मानवी कल्याणाचा मार्ग सांगणारे साहित्य विश्वात्मक साहित्य म्हणून ओळखले जाते.

४) माणसामाणसातील द्वेष, राग, तिरस्कार संपून निकोप आणि सौहादर्यपूर्ण जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारी जीवनमूल्यांची पेरणी संतांनी आपल्या साहित्यातून केली आहे.

५) प्रेम, भूतदया, शांती, क्षमा, अहिंसा ही नैतिक मूल्ये आणि एकता, एकात्मता, न्याय, स्वातंत्र्य यासारखी सांविधानिक मूल्यांचा पुरस्कार देखील संतांनी केला आहे.

६) तत्कालीन समाजात अज्ञान,अंधश्रद्धा, रूढी, परंपरा मोठ्या प्रमाणात बोकाळल्या होत्या. यांच्यावर संतांनी बोट ठेऊन वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारल्याचे आपल्याला लक्षात येईल.

७) वारकरी संप्रदाय जरी हिंदू धर्मातील तत्वज्ञानावर उभा राहिलेला पंथ असला तरी विविध जाती-धर्माची लोक वारकरी संप्रदायात आहेत हे संप्रदायाचे वैशिष्ट्ये आहे, किंबहूना हा वारकरी संप्रदायाचा विश्वात्मक दृष्टीकोन आहे.

**संदर्भ -**

१) पठाण यु.म., संतसाहित्य: शोध आणि बोध, दिलीपराज प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २०१४, पान नं-२४९

२) (संपा.) भगत रा. तु., संतसाहित्य आणि अंधश्रद्धा निर्मूलन, चैतन्य प्रकाशन कोल्हापूर, प्रथमावृत्ती-२००२, पान नं-३६

३) पठाण यु.म., संतसाहित्य: शोध आणि बोध, दिलीपराज प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती २०१४, पान नं-१६९

४) मोहिते शिवाजीराव, ईश्वरनिष्ठांची मांदियाळी, पार्थ प्रकाशन पुणे, तृतीयावृत्ती २०२०, पान नं.२९

५) (संपा.) पांगारकर ल. रा., ज्ञानेश्वरांची प्रभावळ, विदर्भ-मराठवाडा बुक कंपनी पुणे, द्वितीयावृत्ती १९७८, पृष्ठ क्रमांक-१६

६) मोहिते शिवाजीराव, ईश्वरनिष्ठांची मांदियाळी, पार्थ प्रकाशन पुणे, तृतीयावृत्ती २०२०, पान नं-१६५